**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी — ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. ३१ दिनांक १९/०६/२०२४

# पालघर जिल्हा नशामुक्त करणेकरीता अंमली पदार्थांचा शोध घेणेकामी जिल्हास्तरावर संयुक्त कारवाई पथक स्थापन.

पालघर जिल्हयात अंमली पदार्थाच्या व्यापारावर आळा घालणे व अंमली पदार्थांचे सेवन व वापर यांचे संदर्भात परिणामकारक प्रतिबंधात्मक कार्यवा.

ही या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार “जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन सेंटर समिती (NCORD)” स्थापन करण्यात आलेली आहे. मा. जिल्हाधिकारी पालघर , श्री. गोविंद बोडके यांचे अध्यक्षतेखाली आज दिनांक -१८/०६/२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजता जिल्हाधिकारी पालघर, कार्यालयात सदर समितीची बैठक संपन्न झाली आहे.

सदर बैठकीमध्ये समितीचे अध्यक्ष- मा. जिल्हाधिकारी पालघर, श्री. गोविंद बोडके, यांनी पोलीस विभाग, अन्न व औषध प्रशासन विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग व सी.जी.एस.टी. ॲण्ड केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे एक संयुक्त पथक तयार करुन जिल्हयातील अंमली पदार्थ उत्पादन, साठवणुक व वितरण होणारी संभाव्य ठिकाणे ( औषध विक्रेते, औषध व रासायनिक उत्पादन घेणा-या कंपनी, शैक्षणिक संस्थाचे आजुबाजुचे दुकाने ) इत्यादी अचानकपणे तपासणी करण्याचे आदेशीत केले आहे.

त्यानुसार पोलीस विभाग, अन्न व औषध प्रशासन विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग व सी.जी.एस.टी. ॲण्ड केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे एक संयुक्त पथक तयार करण्यात येणार आहे. सदर पथक जिल्हयातील औषध विक्रेते, औषध व रासायनिक उत्पादन घेणा-या कंपनी, शैक्षणिक संस्थाचे आजुबाजुचे दुकाने अशी अंमली पदार्थ उत्पादन, साठवणुक व वितरण होणारी संभाव्य ठिकाणे अचानकपणे तपासणी करुन जिल्हयातील अंमली पदार्थांचे सेवन, वापर व व्यापार यावर प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे.

तसेच २६ जून या आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवसांचे अनुषंगाने जिल्हयात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.